MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

मंत्रिमंडळात सलग तिसऱ्यांदा सामाजिक न्याय मंत्री म्हणून निवड झाली आहे. या निवडीचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्याकडून ऐतिहासिक सत्कार सोहळा आयोजित केला आहे. या सत्कार सोहळ्याची अतिशय जय्यत तयारी बीड शहरात करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने होल्डिंग, कमानी, बॅनर, निळ्या पट्टया व निळ्या ध्वजाचा झंझावात निर्माण करुन निळ्या वादळाचे शक्तिप्रदर्शन रिपाइंच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान मंत्री रामदास आठवले यांचा हा सत्कार सोहळा ऐतिहासिक ठरणार असून त्यासाठी जिल्हाभरातून रिपाइं कार्यकर्ते हजारो गाड्यांचा ताफा घेऊन दाखल होणार आहेत. बीड शहरात रिपाइंच्या वतीने होणाऱ्या मंत्री रामदास आठवले यांच्या भव्य रॅलीत व सत्कार सोहळ्यात हजारोच्या संख्येने सामील होऊन, निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन करावे. असे आवाहन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१८ | शनिवार दि.०५ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -18 | SATURDAY DT.05 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड जिल्ह्याचा भूमिपुत्र पप्पू कागदे महायुतीच्या कोट्यातून आमदारच

- रामदासजी आठवले साहेब तुम्ही केंद्रात आणि पप्पू कागदे राज्यात मंत्री हवाय बीड जिल्ह्यातील जनतेची मागणी मराठवाड्यासह महाराष्ट्रातील बिघड नेत्यांची उपस्थिती
- अठरापगड जातीच्या संकटाच्या वेळी धावून जाणारं नेतृत्व म्हणजे पप्पू कागदे
- पप्पू कागदे यांना बीड जिल्ह्यातील अठरापगड जातीच्या लोकांचा पाठिंबा आजच्या सभेतून दिसून आला
- सत्तर हजाराता जनसमुदाय पप्पू कागदेच्या हाकेला धावून आला रामदास आठवलेचा ऐतिहासिक सत्कार बीडमध्ये वेगवेगळ्या जाती धर्मातील लोक पप्पू कागदेसाठी बीडमध्ये स्वखर्चाने हजर
- बीड जिल्ह्यामध्ये सर्वांचे शक्ती प्रदर्शन झाल्यानंतर आता पप्पू कागद्यांची शक्ती प्रदर्शन ऐतिहासिक. पप्पू कागदेच्या नेतृत्वाखाली रिपाई महाराष्ट्रामध्ये बीड जिल्ह्यात नंबर एकलाच.

**बीड (प्रतिनिधी)**

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले यांचा नागरी सत्कार आज शनिवारी बीडच्या भूमीत होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर युवा रिपाइंचे प्रदेशध्यक्ष पप्पू कागदे यानिमित्ताने जोरदार शक्ती प्रदर्शन करीत, आपली राजकीय दाखत दाखवुन देणार आहेत. पप्पू कागदे या उमद्या नेतृत्वाची संपूर्ण हयात रिपब्लिकन चळवळीत**

**गेली. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यानंतर सर्वाधिक युवा संघटन केलेले नेतृत्व म्हणून पप्पू कागदे यांच्याकडे पाहिले जाते. पप्पू कागदे यांना आमदार झालेले इथल्या जनतेला पहावयाचे आहे, त्यामुळे रामदास आठवले यांनी महायुतीत आपली वर्चस्व पणाला लावून, या सच्चा भीमसैनिकाच्या गळ्यात आमदारकीची माळ घालुन, इतिहास घडवावा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा वर्णी लागल्याने, बीड येथे भव्य दिव्य स्वरुपात नागरी सत्कार सोहळा होत आहे . रामदास आठवले यांच्या सत्कार सोहळ्यासाठी बीड जिल्ह्यात जोरदार तयारी करण्यात आली आहे.**

रामदास आठवले यांना मानणारा मोठा वर्ग बीड जिल्हयात आहे. रिपाइं शाखांच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी रिपब्लिकन चळवळ गावागावात पोहचवली आहे जिल्हयातील जवळपास प्रत्येक गावात रिपाइंची शाखा आहे गावागावात कार्यकर्त्यांची फौज आहे, पक्षाचा आदेश मानून भीमसैनिकांची ही फौज प्रत्येक निवडणुकीत रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचा आदर राखते मात्र बीड जिल्हयाला पक्ष नेतृत्वाकडून फारसी राजकीय ताकद मिळालेली दिसत नाही. रामदास आठवले हे महायुती सोबत आहेत, केंद्रात व राज्यात त्यांचे सरकार आहे. भाजप व मित्रपक्षांनी रिपाइंला सत्तेचा कोटा ठरवून दिलेला आहे, त्यामुळे बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त निष्ठावंताना शासकीय महामंडळे व समित्यावर स्थान मिळाले पाहिजे. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर, पप्पू कागदे यांना विधानपरिषदेवर घेण्यात यावे अशी मागणी



## आज बीडमध्ये निळे वादळ उसळले.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने आज शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरात छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे दुपारी ३:३० वाजता, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सपन्न होतो आहे. या ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्यात निळे वादळ उसळले आहे. मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात आहेत तर यावेळी पप्पू कागदांना आमदार करा आणि आपण केंद्रात मंत्री आणि पप्पू कागदे महाराष्ट्रामध्ये मंत्री अशी परिस्थिती महाराष्ट्राला पाहिजे आहे तरी पप्पू कागदे यांना आमदार करून मंत्रीही करा अशी मागणी बीड जिल्ह्यातून होतात

पुढे आली होती, त्यासाठी रामदास आठवले हेही आग्रही होते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यादीतही पप्पू कागदे यांचे नाव होते, मात्र नंतरच्या काळात परिषदेच्या निवडी मागे पडल्याने, पप्पू कागदे यांना न्याय मिळाला नाही राज्याच्या राजकारणात पप्पू कागदे हे रामदास आठवले यांच्या सोबत खंबीरपणे उभा आहेत, आंबेडकरी चळवळ बुलंद करण्यासाठी राज्यभर फिरत आहे, या नेतृत्वाला आमदार झालेले बीडच्या आंबेडकरी चळवळीला पहावयाचे आहे त्यासाठीच मोठा भीमसागर जमणार आहे, पप्पू कागदे यांच्यासाठी केज राखीव मतदारसंघात अनुकुल वातावरण आहे, कागदे यांनी केजमधून निवडणूक लढवावी अशी मागणी गावागावातून होत आहे त्यामुळे रामदास आठवले यांनी महायुतीच्या जागावाटपात केजची जागा रिपाइला सोडवुन, महायुतीत निळा झेंडा फडकवण्याची संधी गमावू नये , पप्पू कागदे यांना उमेदवारी मिळाली तर, महायुतीला बीड जिल्ह्यासह इतर जिल्हयातील विधानसभा मतदारसंघात नक्कीच फायदा होणार आहे. रामदास आठवले यांची राजकीय ताकद पाहता, ते पप्पू कागदे यांना रिपाइंला मिळालेल्या कोट्यातूनही आमदार करू शकतात, त्यामुळे रामदास आठवले आजच्या सभेत रिपब्लिकन कार्यकत्यांना काय मार्गदर्शन करतात याकडे लक्ष लागले आहे.



# विविध मागण्यांसाठी किसान सभेच्या धरणे आंदोलनात शेतकऱ्यांचा मोठा सहभाग

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत शासन उदासीन –कॉ.ड.अजय बुरांडे

किल्ले धारूर / प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या शेतीमाल भाव, पीक विमा यासह शेतकऱ्यांचे इतर प्रश्न मार्गी लावण्यात शासन सपशेल अपयशी ठरत असुन, हे शासन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास उदासीन असल्याचे प्रतिपादन किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष कॉ.ड.अजय बुरांडे यांनी केला.ते धरणे आंदोलनात बोलत होते. किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी दि.४ ऑक्टोबर रोजी तेलगाव ता.धारूर येथे हनुमान मंदिरात भव्य बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे.शुक्रवारी या आंदोलनाचा पहिला दिवस होता.यात चालु पीक हंगामासह आज पर्यंतचे सर्व पीक विमा तात्काळ वाटप करून, पीक विमा वाटपात पारदर्शकता आणावी, शेतकऱ्यांना कुठल्याही अटी विना सरसकट कर्ज माफी देण्यात यावी,वेगवेगळ्या प्रकारच्या शेतीशी निगडीत अनुदानाचे सर्व शेतकऱ्यांना




तात्काळ वाटप करावे,सर्वच शेतीमालाला हमीभाव द्यावा.यासह इतर अनेक विविध मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात येत आहे.यावेळी आंदोलनात सहभागी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना किसान सभेचे जिल्हाध्यक्ष ड. अजय बुरांडे म्हणाले की,शासन शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात सपशेल अपयशी ठरत असुन, गेल्या कांही वर्षात शेतीमालास योग्य व हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटातुन मार्गक्रमण करावे लागत आहे. शासनाचे निर्णय शेतकरी विरोधी आहेत.यात कांही शेतकरी आत्महत्येचा प्रर्याय अवलंत आहेत. तरीही पाषाण ह्रदयी शासन शेतीमालास भाव देण्यास सक्षम पाऊले उचलत नाही.अशा शेतकरी विरोधी शासनाला सत्तेवर राहण्याचा कसलाच अधिकार नसल्याचे ड. बुरांडे यांनी सांगत शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत किसान सभा वेळोवेळी आंदोलने करून शासनास धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात प्रयत्नशील असते.त्यात पीकविमा वाटपात अनियमितता असल्याने हक्काच्या पीकविम्या पासुन शेतकरी वंचित राहत आहेत. तरी शासनाने शेतकरी हिताचे निर्णय घेऊन, पिकविमा तात्काळ वाटप करून, शेतीमालास हमीभाव जाहीर करावा.व इतर सर्व प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत.जो पर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागत नाहीत, तो पर्यंत धरणे आंदोलन चालुच राहील. असा ठाम निर्धार ही बुरांडे यांनी व्यक्त केला.या प्रसंगी इतरही अनेक वाक्त्यांनी आपले विचार मांडले.या आंदोलनात बहुसंख्य शेतकरी सहभागी झाले आहेत.

## पोलीस अधीक्षकांसाठी लक्षवेधी

# बीड शहर बचाव मंचाने बैठकीत गांभीर्याने लक्षवेधी प्रश्न मांडले

बीड (प्रतिनिधी)

बीड शहर बचाव मंचाच्या वतीने पोलीस अधीक्षक यांना बैठकीची मागणी करण्यात आली होती. या बैठकीमध्ये बीड शहर बचाव मंचाच्या समन्वय समिती मंडळाच्या वतीने बीड शहरातील काही प्रश्न गांभीर्याने मांडण्यात आले. हे प्रश्न पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत त्यापेक्षा हे बीड शहरातील सर्वच भागातील नागरिकांसाठी अति महत्त्वाचे आहेत हे आम्ही त्यांच्या लक्षात आणून दिले. या बैठकीच्या अनुषंगाने बीड शहरातील सर्व भागातील नागरिकांच्या वतीने बीड शहर बचाव मंचाने निवेदन दिले त्यात खालील मागण्या नमूद केलेल्या आहेत.

शहरातील रहदारी सुरळीत व्हावी, यासाठी तात्काळ उपाययोजनात करण्यात याव्यात. शासकीय रुग्णालये, शासकीय कार्यालये मुख्य बाजारपेठां तील रस्ते इत्यादी ठिकाणी पार्किंगची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी. आवश्यक तिथे सगळीकडेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत . उदा. अंबिका चौक ते रिलायन्स पेट्रोल पंप रोडवर



या भागात काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. रस्त्यावरील मोकाट जनावरे कुत्रे अनाधिकृत बॅनर्स फ्लेक्स रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या सर्व बाबी हटवण्यासाठी नगरपालिकेला पत्र देण्यात यावे. शहेनशावली दर्गा बलभीम चौक बार्शी नाका व आवश्यक त्या सर्व ठिकाणी पोलीस चौकी स्थापित करणे व बंद पडलेल्या पोलीस चौकांमध्ये कर्मचारी कार्यान्वित करण्यात यावेत. अवैध धंदे वाढत चाललेली अमली पदार्थांची तस्करी व व्यसनाधीनता इत्यादी बाबत कठोर उपाययोजना करण्यात याव्यात. शाळा, कॉलेजेस, कोचिंग क्लासेस इत्यादी ठिकाणी चिडीमार पथक यांची नियमित फेऱ्या चालू ठेवाव्यात.बंद झालेल्या बँकांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी. बंद झालेल्या बँकांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी, संचालक मंडळांची चौकशी करण्यात यावी.

या बैठकीचे निवेदन देताना, बीड शहर बचाव मंच समन्वय समितीच्या शिष्ट मंडळामध्ये निमंत्रक नितीन जायभाये, अध्यक्ष कॉम्रेड भाऊ प्रभाळे, सेक्रेटरी अशोक येडे, प्रमुख मार्गदर्शक डी.जी. तांदळे उपाध्यक्ष परवेज भाई कुरेशी उपाध्यक्ष फय्याज भाई इक्बाल सय्यद मंचाचे प्रमुख कायदेशीर सल्लागार ॲड. अनिल बारगजे ॲड. नितीन वाघमारे सहसचिव सादेकभाई सय्यद, मार्गदर्शक शेख हाफिज मोईनुद्दीन शहर काझी, किस्किंदा पांचाळ सोबत आदी सदस्यांची उपस्थिती होती.

# विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

जातेगाव प्रतिनिधी - शेतातील विहिरीवरील

वीज पंप चालू

करताना गोरख कनीराम राठोड (वय ४५, रा. भेंडटाकळी तांडा, ता. गेवराई) या गोरख राठोड शेतकऱ्याला विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील भेंडटाकळी तांडा येथे शुक्रवारी सकाळी घडली. गोरख राठोड हे शुक्रवारी सकाळी शेतातील विहिरीवरील वीज पंप चालू करण्यासाठी गेले होते. विद्युत पंप चालू करताना स्टार्टरचे वायर हातात आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. माहिती मिळताच तलवाडा ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ नरके हे घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी गेवराई येथील



उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला. या घटनेने तांड्यावर शोककळा पसरली आहे.

# कोण बनेगा करोडपती मधील किशोर आहेरचा युधाजित पंडित यांनी केला हृदयसत्कार

गेवराई (प्रतिनिधी)

कौन बनेगा करोडपती मध्ये ५० लाख रुपयांच्या १४ व्या प्रश्नापर्यंत मजल मारणाऱ्या गेवराई तालुक्यातील कडेगाव येथील किशोर आहेर यांचा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांनी कौतुक करत सत्कार केला. गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग इन मेकॅनिकल शिक्षण घेऊन सद्या चझडउ ची तयारी करत असलेल्या किशोर काकासाहेब आहेर यांनी सोनी लिव्ह चॅनलच्या कौन बनेगा करोडपती या कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेता अमिताभ बच्चन यांच्या समोर हॉट सीट वर बसून ५० लाख रुपयांसाठीच्या १४ व्या प्रश्नापर्यंत खेळण्याची मजल मारली. आपल्या अभ्यासू आणि ज्ञानाच्या बळावर संपूर्ण जगात पोहोचून बीड जिल्ह्यासाठी अभिमान ठरलेल्या किशोर आहेर यांचा शिवसेनेचे बीड जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित आणि युवा



नेते यशराज पंडित यांनी आपल्या निवासस्थानी शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून हृदयसत्कार केला.

याप्रसंगी बोलताना किशोर आहेर म्हणाली की, अत्यंत गरीब परिस्थिती मी स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करत आहे. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना महाविद्यालयीन फीस भरणे माझ्यासाठी अत्यंत कठीण होते. यासाठी मी शैक्षणिक कर्जासाठी खूप प्रयत्न केले. परंतु ती मिळण्यासाठी मला अडचण येत होती. जेव्हा ही माहिती युवानेते युधाजित पंडित यांना समजली, त्यावेळी त्यांनी माझ्यासाठी प्रयत्न केले आणि मला शैक्षणिक कर्ज मिळवून दिले. ही मदत माझ्यासाठी खूप मोलाची ठरली. कोण बनेगा करोडपती मध्ये प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देताना, केलेल्या अभ्यासासोबतच मला माझ्या आर्थिक परिस्थितीची सुद्धा जाणीव होत होती असेही किशोर आहेर यांनी सांगितले. या प्रसंगी युवा नेते यशराज पंडित, सुनील आहेर, दत्ता खरात यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## माजलगावमध्ये बदलापूरसारखी घटना

# नामांकित शाळेच्या अंगणवाडीत चिमुकलीवर अत्याचार

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव. राज्यात शाळेत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील एका खासगी शाळेतील अंगणवाडीत साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एका अज्ञाताविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपाससुरू आहे. राज्यात बदलापूरच्या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली असून त्यानंतर दररोज कोठे ना कोठे शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या, अन्यायाच्या घटना घडत असल्याच्या उघड होत आहेत. त्यामुळे पालक वर्गात अगोदरच भीतीचे वातावरण पसरलेले आहे. बीड जिल्ह्यातील



माजलगाव शहरालगत असलेल्या एका शाळेत अंगणवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले-मुली दररोज येतात. या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते. तिच्यावर शाळेतील एका अज्ञात इसमाने २७ सप्टेंबर रोजी मधल्या सुटीतील डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली. त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले. घरी आल्यावर चिमुकलीने शाळेत पांढरे कपडे घातलेल्या व्यक्तीने घाणेरडे कृत्य केल्याचे पालकांना सांगितली. शाळेतील पांढरे कपडे घातलेला त्या माणसाला मी ओळखते असेही सांगितले. चिमूरडीच्या माहितीने हादरलेल्या पालकांनी गुरुवारी थेट माजलगाव शहर पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को गून्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणा उपविभागीय अधिकारी धीरजकुमार बच्चू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ व त्यांचे सहकारी करत आहेत.

# डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांचा उद्या गेवराईत सत्कार

## एस एम देशमुख राहणार उपस्थित

गेवराई (प्रतिनिधी)

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल उद्या दिनांक ६ ऑक्टोबर रोजी गेवराईत त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख उपस्थित राहून मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमास पत्रकारांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, गेवराई तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांनी केले आहे.

डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या प्रदेशाध्यक्षपदी बीड जिल्ह्याचे सुपुत्र अनिल वाघमारे यांची तर प्रदेश कार्याध्यक्षपदी संतोष शिंदे आणि कार्यकारणी सदस्य पदी जितेंद्र सिरसाट





यांची नुकतीच निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा उद्या दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह गेवराई येथे गेवराई तालुका डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा पत्रकार संरक्षण कायद्याचे जनक एस एम देशमुख हे आवर्जून उपस्थित राहणार असून तालुक्यातील सर्व प्रेस व डिजिटल मीडियाच्या पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. याप्रसंगी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, गेवराई तालुकाध्यक्ष मधुकर तौर यांच्यासह मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास गेवराई, परळी , आंबाजोगाई, केज, बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर, वडवणी, धारूर, माजलगाव या तालुक्यातील सर्व मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या पत्रकार बांधवांनी आवर्जून बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, डिजिटल मीडिया परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांच्यासह डिजिटल मीडियाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# बिंदुसरा धरणाचा स्विमिंग पूल झालाय; पर्यटकांचे धाडस जीवघेणे तर प्रशासन बेफिकीर :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प पुर्ण क्षमतेने भरले असुन ओसंडून वाहत आहे. त्यामुळे बीड शहरातील तसेच धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीमुळे तलावाच्या सांडव्यावरून वाहणारे पाणी पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे.मात्र याचवेळी काही हौशी पर्यटक सांडव्यातील भिंतीवरून जीव धोक्यात घालून चालताना दिसतात तर काही धरणाच्या भिंतीवर बसुन फोटोसेशन करतात.तर काही जण धरणाच्या पाण्यात उड्या मारत पोहतात. बिंदुसरा धरण पाणलोट क्षेत्र अंतर्गत प्रतिबंध क्षेत्रात अपघात, दुर्घटना अथवा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे आवश्यक उपाययोजना करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार बीड, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक




३ बीड, पोलिस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन बीड यांना केली आहे. सोमवार रोजी बिंदुसरा धरणाच्या सांडव्याच्या डोहातील पाण्यात बुडुन मृत्यूमुखी पडलेल्या ओंकार शिंदे आणि शिव पिंगळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करू सुरक्षित पर्यटन करावे यासाठी संदेश दिला जाणार आहे.

बिंदुसरा धरणाचा सांडव्याशेजारी धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडेला सावधान प्रतिबंधात्मक क्षेत्र असा फलक लावण्यात आला असुन अपघात, दुर्घटना अथवा जिवितहानी झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार नाही असे कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड यांच्या आदेशानुसार असे लिहिलेले पाहावयास मिळते. बीड ग्रामीण पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधला असता जबाबदारी जायकवाडी प्रकल्प संबधितांची असल्याचे सांगितले जाते. एकंदरीतच दोन्ही विभागाकडून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.

दि.१९ ऑक्टोबर २०२१ रोजी बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून ओंकार लक्ष्मण काळे वय १६ वर्षे आणि शिव संतोष पिंगळे वय १६ वर्षे रा.शिंदेनगर कॅनॉल रोड बीड यांचा दुर्दैवी अंत झाला होता. मात्र यापासून पर्यटक कोणताही बोध घेत नसुन त्यांचे लक्ष्य वेधण्यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दि.०७ सोमवार रोजी बिंदुसरा धरणाच्या ठिकाणी मयत ओंकार शिंदे आणि शिव पिंगळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून सुरक्षित पर्यटन करावे असा संदेश दिला जाणार आहे.




वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील प्राथमिक जिल्हा परिषद शाळा खापरवाडी या ठिकाणी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली, यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक या ठिकाणी त्रिमूर्ती सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ देवडी या संस्थेमार्फत, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले, या ठिकाणी शाळेचे मुख्याध्यापक सह शिक्षक संस्थेचे अध्यक्ष तसेच गावातील प्रतिष्ठत नागरिक गावकरी उपस्थित होते, यावेळी संस्थेचे अध्यक्ष ईश्वर पटाईत, गोविंद कुरे, दत्तात्रय सुरवसे, अशोक लंगडे, सिताराम लंगडे, ईश्वर पुजारी, सुरज पटाईत, सहशिक्षक बिडकर वैभव , श्रीमती हंबर्डे मॅडम, श्रीमती राऊत ज्योती मॅडम, आधी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# उपविभागीय गेवराई येथे वाचक म्हणून सपोनि नारायण एकशिंगे यांची नियुक्ती

## चकलांबा पोलीस ठाण्याचे सपोनि संदीप पाटील हे नवे कारभारी

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गेवराई तालुक्यातील चकलांबा या पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांची बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई येथे वाचक म्हणून देण्यात आले आहे. चकलांबा या ठिकाणी जिल्हा विशेष शाखेतून संदीप पाटील हे रूजू होणार आहेत. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी हे आदेश काढले आहेत.**



सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी त्यांच्या कार्यकाळात गुन्हेगारी, अवैध धंदे राजरोसपणे सुरू असताना, त्यांच्यावर कठोर पावलं उचलत कारवाई करून गुन्हेगारी व अवैध धंद्यावर आळा घातलेला आहे. चकलांबा येथील नागरिकांना चकलांबाच्या इतिहासात पहिल्यांदाच असा कर्तव्यदक्ष आणि सिंघम अधिकारी पाहायला मिळाला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासात घेऊन पोलीस आणि नागरिकांमध्ये सलोख्याचे संबंध तयार केले.गुन्हेगारांना तसेच अवैध धंदे करणाऱ्यांना आळा घालत कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी चोख पार पाडले आहे. त्यांच्या कार्यकाळात अवैध धंदे हे बंद आहेत. आता यापुढे पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे अवैध धंदे असेच बंद ठेवतील का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. असा खमक्या आणि सिंघम अधिकारी म्हणून नारायण एकशिंगे यांची ओळख निर्माण झाली आहे. आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावत असताना, तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र पाहरा देऊन पोलीस खात्यातील कर्तव्यनिष्ठ व प्रमाणिक अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांची ओळख आहे.

# प्राण्याचं व माणसाचं नातं फार जुने आहे, काळे

आष्टी (प्रतिनिधी)

पिंपरी घाटा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वन्यजीवन सप्ताह एक ते सात आक्टोंबर पर्यंत चालू झाला असल्याने नुकताच या शाळेत वन विभाग आष्टी यांच्या वतीने सप्ताह आयोजन करण्यात आलं होतं यावेळी वनरक्षक काळे म्हणाले की पूर्वीपासून प्राण्याचे माणसाचं नातं अजून आहे परंतु वाढती शहरीकरण त्यामुळे प्राणी वापर सध्या कमी आहे प्राण्यांच्या भरपूर जाती नामशेष होत चालले आहेत त्यामुळे आपण वन्य प्राण्यांना जीव लावणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पिंपरी ते सरपंच मोहन आमटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून येईल तागड वनपाल एस काळे वनरक्षक के डी पदलवाड वनरक्षक जे बी आर गाडे वनरक्षक श्रीमती विधाते मॅडम वनरक्षक श्री तांदळे वनसेवक मोहिते गोरख पवार शकील वन सेवक भुकण जाधव पत्रकार सुरेश कांबळे आदी वन विभागाचे मान्यवर या ठिकाणी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन झिंजुर्के सर यांनी केले शाळेच्या परिसरात वृक्ष लागवड करून विद्यार्थ्यांना वनविभागाचे अधिकार या मार्फत मार्गदर्शन करण्यात आली कार्यक्रमाचे आभार कचरे सर यांनी मांडली



# लाडकी बहिणी योजनांसाठी सामान्या नागरिकांनाच खिश्यावर दरोडा

अगदी साध्या कारणासाठी नोटरी करायची असेल तर आता त्यासाठी पाचशे रूपयांचा मुद्रांक वापरावा लागणार आहे. काही दिवसांपूर्वीच खाद्य तेलांचे दर वाढले आहेत. मद्यावरील उत्पादन शुल्क देखील वाढविण्यात आले आहे. येत्या काळात आणखी कशा कशामध्ये करवाढ करून राज्य चालविण्याची वेळ सरकारवर येईल हे आज सांगता येणे अवघड आहे इतके सरकारच्या प्रसिध्दीसाठीच्या आणि मतपेढीसाठीच्या लाडक्या योजनांनी राज्याला कंगाल केले आहे.

महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना ज्यावेळी सरकारने जाहीर केली होती. त्याचवेळी त्यासाठी पुरवणी मागण्यांमधून तरतुद करावी लागणार हे स्पष्ट होते. मुळात ज्या राज्याचा मुळ अर्थसंकल्प तुटीचा आहे, कर्ज काढून राज्य चालविण्याची वेळ आलेली असून कर्जाचा डोंगर वाढत आहे. त्या राज्यात अर्थसंकल्पा बाहेर जाऊन पुरवणीच्या जोरावर किती योजना राबवाव्यात याला काही मर्यादा असतात. पुरवणी मागण्या या अचानक उद्भवणाऱ्या तातडीच्या खर्चासाठी करणे समजू शकते. मात्र एकाच योजनेसाठी हजारो कोटींची तरतुद पुरवणी मागणीतून केल्यानंतर राज्याचा आर्थिक गाडा घसरणार होता है तर निश्चितच. आता तेच पहायला मिळत आहे. लाडकी बहीण आणि मतांवर डोळा ठेवून आखलेल्या तत्सम योजनांसाठी वेगवेगळ्या ठिकाणचा निधी वळविला जात आहे. मागच्या काही काळात बांधकाम विभागाचा निधी हडपण्यात आला.

तिर्थक्षेत्र, पर्यटन या विभागांना द्यायला सरकारकडे पैसा नाही. ग्रामविकासची कामे कोणत्याही क्षणी ठप्प पडतील अशी परिस्थिती आहे. वेगवेगळ्या विभागांमधून सध्या शेकडो, हजारो कोटींच्या कामांना मंजुरी दिली




जाते. मात्र आर्थिक तरतुद होणार का? याची शाश्वती कोणालाच नाही. एकीकडे हे सुरू असतानाच राज्यातील सत्ताधारी मात्र योजना बंद होणार नाही. राखी पौर्णिमेची ओवाळणी दिली. आता बहीणींना भाऊबिजेची ओवाळणी देऊ अशा घोषणा करत आहेत. अर्थ विभागाच्या अधिकाऱ्यांनी यापूर्वीच महाराष्ट्राची अवस्था किती कंगाल झाली आहे ते सांगितले आहे. अशा परिस्थितीत राज्य चालवायचे तर करवाढ हा एकमेव मार्ग सरकारकडे असतो. आणि सरकार सध्या तेच करत आहे.

उत्पन्नाचे इतर स्त्रोत मर्यादीत आहेत. जीएसटीचे संकलन वाढविले असे गृहीत धरले तरी केंद्राकडून त्याचा वाटा मिळणार किती आणि कधी? हा प्रश्न असतोच. त्यामुळे आता राज्याच्या अंतर्गत असलेल्या विषयांमधून 'जिझीया' वसुलीचा सपाटा सरकारने लावला आहे. मुद्रांक शुल्क वाढ हा याचा मोठा पहिला फटका आहे. नोटरी किंवा इतर गोष्टींसाठी पूर्वी शंभर रूपयांच्या मुद्रांकावर व्यवहार व्हायचे आता ते मुद्रांक शुल्क सरकारने थेट पाचशे रूपये केले आहे. म्हणजे भाऊजींच्या घरावरचे पत्रे विकण्याची वेळ आणायची, आणि त्यातूनच बहिणीला ओवाळणी टाकायची असला उरफटा न्याय सध्या राज्यात सुरू आहे. मागच्या महिनाभरात वेगवेगळ्या गोष्टींवरचे शुल्क छुप्या पद्धतीने किंवा जाहीर पद्धतीने वाढविले जात आहे. महागाई वाढत आहे. खाद्य तेलांचे दर वाढले. पिठाचे दर वाढले, वेगवेगळ्या वस्तुंवर कर किंवा अधिभार वाढवून सामान्यांना लुटून राज्य चालविण्याची वेळ सत्ताधाऱ्यांवर आली आहे. त्यामुळे मोफतच्या योजना काही लोकांना सुखावत असल्या तरी एकीकडे शंभर रूपयांची योजना दाखवून दुसरीकडे सामान्यांच्या खिशातील हजार रूपयांवर दरोडा टाकण्याचे काम सरकारी धोरणांमधून होत आहे.

# ऊसतोड कामगारांसाठी 'संत भगवानबाबा ऊसतोड कामगार अपघात विमा' योजना लागू

मुंबई ।प्रतिनिधी

राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याअंतर्गत ऊसतोड कामगार व वाहतूकदार, मुकादम आदींसाठी संत भगवानबाबा ऊसतोड कामगार विमा योजना प्रस्तावित केली होती, त्या योजनेस आज संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, मुकादम तसेच सुमारे दीड ते दोन लाख बैलजोड्या त्याचबरोबर कामगारांच्या झोपड्या यांना सुद्धा विम्याचे कवच आज झालेल्या निर्णयानुसार लागू करण्यात येत असून या योजनेचा संपूर्ण खर्च स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या भांडवलातून खर्च करण्यात येईल. ऊसतोड कामगार, मुकादम, कारखाना यांपैकी कुणावरही या योजनेचा कसलाही आर्थिक भार राहणार नाही.

राज्याच्या बीडसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच शेजारील राज्यात कमीत कमी ६ महिने स्थलांतर करून उसतोडणीला जातात. ऊन, वारा, पाऊस, थंडी अशा कोणत्याही परिस्थितीत दिवसरात्र अत्यंत मेहनत व जोखमीचे काम त्यांना करावे लागते. ऊसतोडणी व वाहतुकीदरम्यान अनेक अपघात, विजेचा शॉक, सर्पदंश, वाऱ्या-पावसाने नुकसान, रस्ते अपघात यांसारख्या शेकडो समस्यांना तोंड देताना ऊसतोड कामगारांचे अनेकदा जीव जातात, अनेकजण कायमस्वरूपी अपंग होतात व त्यांच्या कुटुंबाचा आधार नाहीसा होतो.

त्यामुळे या ऊसतोड कामगारांना, वाहतूक कामगारांना तसेच त्यांच्या पशूंना स्वतंत्र अपघात विमा योजना असावी, त्याद्वारे मृत्यू झाल्यास आर्थिक मदत, अपंगत्व आल्यास आर्थिक मदत व उपचार अशा निरनिराळ्या तरतुदी असाव्यात असे २०२२ मध्ये धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत



प्रस्तावित केले होते. राज्याचे मुख्यमंत्री व सध्याचे सामाजिक न्याय मंत्री एकनाथराव शिंदे यांनी अर्थ व नियोजन विभागाच्या समन्वयातून या योजनेला मूर्त स्वरूप दिले असून, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ऊसतोड कामगारांना विम्याचे कवच असावे, हे स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न आज महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण होत आहे आणि त्यात माझाही काही वाटा आहे, याचा मनाला मनापासून आनंद वाटतो आहे, याबाबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनापासून आभार मानतो, असे भावनिक उद्गार धनंजय मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले आहेत.

### स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या एका स्वप्नपूर्तीत माझा वाटा आहे,याचा आनंद वाटतो–धनंजय मुंडे

पूर्वी केवळ कागदावर राहिलेले ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून सामाजिक न्याय खात्याकडे हस्तांतरित करून घेत धनंजय मुंडे यांनी या महामंडळाला मूर्त स्वरूप दिले. महामंडळाचे कार्यकारी संचालक मंडळ, लेखाशीर्ष निर्माण करून ऊसतोड कामगारांची प्रथमच शासकीय कागदावर 'ऊसतोड कामगार'म्हणून नोंदणी केली. या महामंडळाचा खर्च शासनावर अधिभार होऊ नये म्हणून राज्यात गाळल्या जाणाऱ्या उसावर प्रतिटन १० रुपये कल्याण निधी साखर कारखाना व त्याच्या समप्रमाणात निधी शासनाकडून अशी कायमस्वरूपी व्यवस्था केली. याच महामंडळाच्या माध्यमातून राज्यात संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करून ऊसतोड कामगारांच्या मूला मुलींसाठी ८२ वसतिगृहे सुरू करून ऊसतोड कामगारांच्या हातात वडिलोपार्जित कोयता न देता पाटी–पुस्तक देऊन शिक्षणाचा मार्ग खुला केला आहे. त्यापाठोपाठ आता ऊसतोड कामगारांच्या विम्याचा प्रश्न निकाली निघाल्याने काही प्रमाणात का असेना परंतु कायम विकासापासून वंचित राहिलेल्या या वर्गाला खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे, असे म्हणता येईल.

# माझी 'अभिजात' मराठी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा अधिकृतपणे प्राप्त झाला याचा सर्वच मराठी भाषकांना अभिमान आहे. याचा संदर्भ थेट बीड सोबत असल्याचा विशेष आनंद समस्त बीडवासियांना आहे. याच बीडच्या भूमीत आद्यकवी मुकुंदराज यांनी शके १११० मध्ये पहिला मराठी ग्रंथ विवेकसिंधू लिहिला.

मराठी भाषा ही मूळची आर्यांची भाषा मानली जाते. भाषेचा उगम उत्तरेकडे झाला असला तरी ही भाषा सातपुडा पर्वतरांगांपासून खाली कावेरी नदीच्या खोऱ्यापर्यंत विस्तारली व स्थिरावली. भाषा दर दहा कोसांवर बदलते आणि त्यानुसार मराठी संभाषणाच्या विविध शैली विकसित होत गेल्या.

मराठी भाषा बोलणारे राज्य म्हणून १९६० साली भाषावार प्रांतरचनेत महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. त्यानंतर आजपर्यंत याच सतत विकास आपण बघतो. त्यापूर्वी असणाऱ्या काळातील मराठी भाषेचा प्रवास देखील तितकाच महत्त्वाचा आहे.इसवी सन ५०० ते ७०० या काळात पूर्ववैदिक, वैदिक नंतर संस्कृत, पाली प्राकृत यात विविध उत्क्रांत होत मराठी भाषेचा उगम झालेला मानला जातो. 'श्री चामुन्डाराये करविले' असे शिलालेखावरील मराठी भाषेत लिखित पहिले वाक्य श्रावणबेळगोळ येथे असल्याचा दाखला उपलब्ध आहे.

संत वाङमयातून मराठीचा लिखित प्रसार होत गेला. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर यांच्या रचनांमधून लिखित तसेच बोलीभाषेतील मराठी प्रगत आणि प्रगल्भ होत होती .मराठी भाषेबाबत संत ज्ञानेश्वर यांनी केलेले वर्णन सार्थ आहे. 'परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरेचि रसिके मेळविण'.भाषेत असणारे सौंदर्य आणि ते अधिक खुलविणारे अलंकार सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्याचाही स्विकार करणारी भाषा म्हणून मराठीला पाहिले जाते. सर्व भाषांमधील शब्दांना जोडत आल्याने मराठी अधिकच समृद्ध झालेली आहे.इतक्या वर्षांच्या प्रवासात विविध शासकांचा अंमल या प्रांतावर राहिला त्यामुळे मराठी भाषेत शब्दसंग्रह सातत्याने वाढत राहिला. अरबी, फारसी, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषेतील शब्द मराठीत कायमचे आले आणि आज ते मराठी भाषेचा भाग बनलेले आपणास दिसतात. आज संगणक युगात मराठी इंटरनेटच्या प्रमुख भाषांपैकी एक आहे आणि मराठी भाषक आवर्जून मराठीचा वापर करतात, ही अतिशय अभिमानाची बाब आहे.

साधारण २०१० च्या प्रारंभी फेसबुकच्या सारख्या माध्यमातून मी मराठी वापरायला सुरुवात केली. त्यावेळी इंग्रजी शब्दावलीत मराठी संदेश लिहिणारे अधिक होते व मराठीचा असा मराठीचा वर्ग मी सुरू केल्यावर अनेक जण मराठी कडे आकर्षित झाले. संगणक क्रांतीत 'युनिकोड' आल्याने या आभासी जगात मराठीचा झपाट्याने विस्तार झाला. मी स्वतः या माध्यमाला दिलेले शब्द आज दरमहा कोट्यावधी वेळा वापरल्याचे संदेश येतात. त्यावेळी मराठी भाषक म्हणून यांचा मलाही अभिमान वाटतो.

मराठी भाषेचा प्रवास केवळ पुस्तकातूनच नव्हे तर प्रत्यक्षात अनुभवण्याची संधी मला शासकीय नोकरीच्या निमित्ताने मिळाली. २२ जिल्ह्यांमधून फिरताना त्या त्या ठिकाणचा मराठीचा लहेजा आणि गोडवा जाणवतो. रत्नागिरी ते गडचिरोली असा कार्यक्षेत्राचा प्रवास राहिल्याने मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात जशी भाषा वेगवेगळी बोलली जाते तशीच ती वऱ्हाडात, झाडीपट्टीत, पश्चिम महाराष्ट्रात तसेच कोकणात, खानदेशात आणि पुण्या - मुंबईतही वेगळी राहते.

महानगरीय प्रभाव असणारी मुंबईची मराठी खूपच वेगळी आहे. विद्येचं माहेरघर पुण्याची मराठी तितकीच सरळ आहे. आत्मियता जपणारी आणि विशिष्ट शब्दांना खेळवणारी वर्धा - नागपूरची मराठी वेगळी आहे. सिमावर्ती जिल्ह्यांमध्ये सिमेलगत असणाऱ्या नजिकच्या राज्यातील भाषेच्या प्रभावाखाली असणारी मराठी आणखीनच वेगळी वाटते.कोकणात मालवणी आणि तळकोकणची मराठी आणि गडचिरोलीतील मराठी एकदम भिन्न आहेत. जिल्हा बदल झाल्यास जाणवतं की पदार्थ, वस्तू आणि भांड्यांची नावे एकाच भाषेतली असली तरी ती जुळत नाही.पुण्यात अमृततुल्य अर्थात चहा करतात तर मुंबईत चहा बनवतात. विदर्भात मात्र चहा मांडतात ही भाषिक गंमतच आहे. साधारणपणे रस्त्यावर डावीकडे किंवा उजवीकडे वळतात मात्र खानदेशात डावीकडे फाकाचं असतं. मराठवाडी माणसं अंगावर कपडे अंगावर घालतात मात्र वैदर्भिय मराठीत कपडे लावतात..खूप वाटत असला तरी तोच मराठीचा वेगळेपणा आहे. अगदी भाषा तीच फरक.. काई त नी. (वर्धा) अर्थात काही तर नाही....!

प्रशांत विजया अनंत दैठणकर
जिल्हा माहिती अधिकारी,
बीड
९८२३१९९४६६

# गोरगरीबांचे आशिर्वाद आमची कवच कुंडली - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

## जगाकडे न पाहता स्वत:च्या ध्येयाकडे बघत चला- ह.भ.प.शर्मा महाराज

बीड (प्रतिनिधी)

बीड-नगर-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार माजी खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या समाधीला आदरांजली वाहून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांनी स्व.काकूंनी लहान पणापासून स्वत:ला पुढे नेत दारिद्र्याचे चटके सहन करत त्यांनी पुढची पिढी समृध्द होण्यासाठी प्रयत्न केला. राजकीय, सामाजिक प्रवाहात अनेक टप्पे त्यांनी पाहिले असे प्रतिपादन केले तर स्व.काकूंनी आपले सर्व आयुष्य जनतेच्या सेवेत घालवले. जगाचे कल्याण संतांची विभुती, किर्तीरूपी उरावे, बीज पेरले तर उगवेल, फुलेल आणि बहरेल, केले कर्म भोगा त्याचे आले या जन्मात जे काही कराल तेच त्या जगात करण्याची संधी, जसे कर्म केले तसे फेडावे लागतात असे प्रतिपादन ह.भ.प.शर्मा महाराज यांनी केले.

शुक्रवार दि.४ रोजी स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या समाधीला आदरांजली वाहण्यासाठी जिल्ह्यातून मोठा चाहतावर्ग आला होता. या पुण्यतिथीनिमित्ताने ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन आयोजीत केले होते. यावेळी ह.भ.प.प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड, ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प.उध्दव महाराज चोले, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज बरडकर, ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर, ह.भ.प.परशुराम महाराज मराडे, ह.भ.प.नाना महाराज ढेकणमोहाकर, ह.भ.प.नाना महाराज कदम, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.अभिमान महाराज ढाकणे, ह.भ.प.योगेश महाराज जोगदंड, ह.भ.प.मकरंद महाराज जोशी, ह.भ.प.पांडुरंग महाराज शिंदे, ह.भ.प.भागवत महाराज नरवडे, ह.भ.प.नरेश महाराज संगमेश्वर, ह.भ.प.सुग्रिव महाराज डाके, ह.भ.प.ओंकार महाराज कागदे, ॲड.कालिदास थिगळे, प्रा.जगदिश काळे, अरूण डाके, दिनकर कदम, विलास बडगे, हेमंत क्षीरसागर, नानासाहेब काकडे,माधवराव मोराळे, बाबूसेठ लोढा, विजुताई महिंद्रे, पुष्पाताई पांगारकर, लतीका भांडकर, विलास विधाते, मुखीद लाला, जयश्रीताई विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती




पुढे बोलतांना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, गोर गरीबांचे आशिर्वाद आपले कवच कुंडले आहेत, हे संस्कार काकूंनी स्विकारून जिल्ह्याच्या मुख्य पदावर विराजमान होत जिल्ह्यात पहिली नगर-बीड-परळी या रेल्वे मार्गाचे उद्घाटन केले आणि खर्या अर्थाने या रेल्वे मार्गाचे त्या शिल्पकार आहेत. लहानपणी काकूंनी संघर्ष केला, संघर्षातून नानांचा संसार उभा करत राजकीय वाटचाल सुरू केली. काकूंचे बोट धरून आम्ही पुढे आलोत, काकूंनी आमच्यावर जे संस्कार केले ते संस्कार आणि त्याचा वारसा पुढे नेण्याचे काम करत आहोत. राजकीय, सामाजिक प्रवाहात अनेक चढउतार पाहिले, मात्र गोर गरीबांचा आशिर्वाद आमच्यासाठी कवचकुंडले ठरली. स्व.काकूंचे संस्कार पदोपदी उपयोगी ठरले. काकूंच्या पंखात गरूडझेप घेण्याची ताकद होती असे त्यांनी सांगितले. किर्तन सांगतांना ह.भ.प.समाधान महाराज शर्मा महाराज यांनी सांगितले की, शाम ची आई, राम ची आई आणि आपली आई या तिन्ही आईचे महत्व मनातून वाचा म्हणजे किर्तनाचा अर्थ कळेल. अंधाराला सोबत घेतल्याशिवाय काजव्याला पुढे जाता येत नाही. कौशल्या नावाच्या विद्यापिठातूनच रामाने मर्यादा शिकली. जे चांगले असते ते आदी लोकांनी घ्यावी लागते. म्हणून जुन्या काळी घरी बनवलेल्या वस्तू शेजारी देण्याची पध्दत होती. जग हे मोठं म्हणाल तर दुसर्या दिवशी खोटं म्हणत असेल. जगाकडे न पाहता स्वत:च्या ध्येयाकडे पहावे असे ते म्हणाले. यावेळी भरत लोळगे, सुधाकर मिसाळ, उषाताई सरवदे, शारदाताई डुलगज, गणपत डोईफोडे, अर्जुन बहिरवाळ, प्रा.दत्तात्रय आघाव, नानासाहेब काकडे, विष्णु जाधव, गणेश जवकर, सुरेश क्षीरसागर, उध्दव म्हेत्रे, पी.बी. भांडेकर, बिट्टी बहिर, एस.टी.नखाते, पांडुरंग तोंडे, आसाराम औसरमल, प्रा.आर.टी.गर्जे, रत्नाकर क्षीरसागर, नवनाथ कुलकर्णी, अशोक शेटे, शेख नसीरभाई, राजेंद्र पवार, प्रा.सत्येंद्र पाटील, राजेंद्र मुनोत, ॲड.दत्तात्रय डोईफोडे, राजेंद्र आगवान, विशाल क्षीरसागर, सखाराम मस्के, तुषार घुमरे, सुभाष क्षीरसागर, शेषेराव फावडे, अंकुश राठोड,ॲड. विष्णूपंत काळे, विजय सरवदे, वैभव क्षीरसागर, प्रविण सुरवसे, डॉ.मारूती आंधळे, ॲड.कालिदास थिगळे, डॉ.अरूण भस्मे, डॉ.राजा मचाले, चंद्रकांत पेंढारे, मूरलीधर राऊत, बंडू लांडे, शशिकांत माने, सतिष काटे, नसीर इनामदार, अन्सारी मैनोद्दीन, सादेक फारोकी, सतीष राठोड, सतपाल लाहोट, दिलीप आहेर, सर्जेराव खटाणे, अंबादास गुजर, अशोक वाघमारे, शेषनारायण कोळेकर, अर्जुन नलवडे, प्रा.सुदाम नवले, बबन वडमारे, प्रकाश उपरे, कोंडिराम निकम, धनंजय मोरे, भागवत खाकरे, गणेश राऊत, संपद गुंदेकर, गोपिचंद गुंदेकर, परमेश्वर घुमरे, विष्णूपंत पवार, बाबू घुमरे, प्रशांत पवार, उध्दव क्षीरसागर, पाशाभाई, शेख फय्यीम, जलील पठाण, खुर्शीद आलम, विश्वंभर सावंत, तानाजी कदम, निवृत्ती डोके, दादासाहेब मुंडे, कल्याण खांडे, राम भोगे, प्रकाश ईंगळे, लिंबाजीराव जाधव, दिनेश पवार, गोविंदराव जाधव, पांडुरंग होमकर, सतिष राऊत, सुग्रीव रसाळ, सुरेश काशिद, कैलास सामसे, रमेश कागदे, पांडुरंग शिंदे, नवनाथ घोडके, सचिन घोडके, जलीलखान पठाण, अय्युब तांबोळी, सुलेमान पठाण, संजय सानप, सुधाकर जाधव, प्रभाकर सानप, लक्ष्मण ढास, कैलास येडे, श्रीरंग खटाणे, गौतम खटोड, विनेश कागदे, नितीन कागदे, भास्कर शेळके, राम शेळके, मधुकर पाटील, ओंकार कागदे, महादेव वक्ते, चिमाजी वाघमारे, बिभीषण घुगे, बापुराव शिंदे, सुभाष शिंदे, आबासाहेब मस्के, कुंडलिक धसे, श्रीराम मस्के, दिलीप डोंगर, शेख राजू, शरद ढाकणे, रवी निर्मळ, महारूद्र वाघ, दिनेश साठे, सतिष जोगदंड, बबनराव साठे, सय्यद आय्युब, मुरलीधर मोरे, विठ्ठल झोडगे, बाबुराव मिटकरी, चंदन मिटकरी, अनिल शिंदे, दत्तात्रय जोगदंड, जयदत्त कांबळे, नवनाथ तांदळे, आजिनाथ सोनवणे, सुधाकर मंचुके यांच्यासह डॉक्टर, वकील, इंजिनिअर, पत्रकार, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, महिला-पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

स्व.काकूंच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प.समाधान महाराज यांच्या तोंडातून निघणारी वाणी आणि विनेचा स्वर राज्यात नव्हे तर देशात घूमतो असे मौलिक विचार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर बोलत असतांना त्यांचा कंठ दाटून आला आणि डोळे पाणावल्याचे दिसुन आले.

# केज विधानसभा मतदार संघात १४ नवीन विद्युत उपकेंद्रांना मंजुरी

## भविष्यातील ५० वर्षे योग्य दाबाने होणार वीज पुरवठा - आ. नमिता मुंदडा

अंबाजोगाई - केज विधानसभा मतदार संघात महावितरणच्या गावठाणसाठी सुधारित वितरण क्षेत्र (आरडीएसएस) योजनेंतर्गत ३३ केव्हीची नवीन उपकेंद्रे उभारण्यात येत आहेत. तर, ८० कोटी रुपये खर्च करून गावठाण फिडर आणि शेती पंपासाठीचे फिडर वेगवेगळे केले जाणार आहेत. याशिवाय मतदार संघात काही ठिकाणी अतिरिक्त ५ एमव्हीचे रोहित्र तर काही ठिकाणी नवीन १०० चे रोहित्र बसविण्यात येणार असल्याची माहिती केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी दिली. त्यासोतच काही भागात गायरान जमिनीवर सौर पॅनल उभारून त्याद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

केज विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये गावठाण आणि शेतीपंपाचे फिडर एकच असल्याने गावठाणास अखंडित वीज पुरवठा मिळणे शक्य होत नाही. गावठाणातील ग्रामस्थांना घरगुती वापराची अखंडीत वीज मिळाली पाहिजे यासाठी केंद्र व राज्यसरकारच्या प्रत्येकी ५० टक्के निधीतून सुधारित वितरण क्षेत्र (आरडीएसएस) योजना राबविण्यात येते. भविष्याचा वेध घेत या योजनेचा लाभ केज विधानसभा मतदारसंघाला मिळण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी ऊर्जा विभागाकडे पाठपुरावा करून ८० कोटींचा निधी उपलब्ध करून घेतला. याची निविदा प्रक्रिया देखील पूर्ण झाली आहे. यातून गावठाण फिडर आणि शेती पंपासाठीचे फिडर वेगवेगळे केले जाणार आहेत. त्यामुळे गावठाणात अखंडित वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे. तसेच, जिथे नियमानुसार लोड आहे, आवश्यकता आहे ते सर्व्हेक्षणात घेतले असून तिथे १००



केव्ही रोहित्र बसविण्यात येणार आहेत. अनेक ठिकाणी जुने ११ केव्ही, ३३ केव्ही एल.टी. कंडक्टरची साईज कमी पडत आहे, कंडक्टरचे तुकडे पडत आहेत तिथे उच्च दर्जाचे कंडक्टर बसविण्यात येणार आहेत. नवीन ११ केव्ही, ३३ केव्ही लिंकलाईनची कामे करण्यात येतील. इन्सुलेटर, फिडर नुतनीकरण, दोन खांबात जास्त अंतर असेल तर्नवीन खांब उभारणे, नादुरुस्त खांब, ११ केव्ही, ३३ केव्ही बदलणे आदी कामे केली जातील. तसेच, ३३ केव्ही सबस्टेशन, ११ केव्ही फिडर वेगवेगळे करण्यात येणार असून ज्या गावातील रोहित्र वारंवार फेल होत आहेत तिथे एबी केबल टाकण्यात येणार आहेत.

नवीन ३३ केव्ही उपकेंद्रांची होणार निर्मितीकेज मतदार संघातील धावज्याची वाडी (ता. बीड), उंदरी, केवड, कासारी, सोनीजवळा, सारूळ, अशोक नगर (ता. केज), मगरवाडी, डीघोळआंबा, सोमनाथ बोरगाव, येल्डा, पाटोदा देवळा, पोखरी रोड अंबाजोगाई या ठिकाणी नवीन ३३ केव्ही उपकेंद्राची कामे होणार आहेत.

अनेक उपकेंद्रातून अतिरिक्त ५ एमव्हीचे रोहित्र

मतदार संघातील एकूण अकरा ३३ केव्ही उपकेंद्रात ५ एमव्हीचे अतिरिक्त रोहित्र बसविण्यात येणार आहे, यामध्ये नेकनूर (ता.बीड), आडस, कुंबेफळ, साळेगाव, चिंचोली माळी, कानडी माळी, युसुफ वडगाव, येवता, जवळबन (ता. केज), आपेगाव, कुंबेफळ (ता. अंबाजोगाई) या उपकेंद्रांचा समावेश आहे. तर, पाटोदा येथील ३३ केव्ही उपकेंद्रात ५ एमव्हीचे दोन नवीन रोहित्र लावले जाणार आहेत. तसेच, मांडवा पठाण (अंबाजोगाई) येथील उपकेंद्रात ५ एमव्ही ऐवजी १० एमव्हीचे रोहित्र बसवून क्षमतावाढ केली जाणार आहे.

सारूळ उपकेंद्राची निविदाप्रक्रिया पूर्ण

आ. मुंदडा यांचा प्रयत्नातून केज तालुक्यातील सारूळ येथे २२० / १३२ / ३३ केव्हीचे उपकेंद्र मंजूर झाले होते. याची निविदा प्रक्रिया पूर्ण झालासून येत्या तीन ते चार महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. यापैकी १३२ केव्ही उपकेंद्रासाठी आणखी २ हेक्टर जमिनीची आवश्यक असून त्याची कार्यवाही सुरू आहे. हे उपकेंद्र वीज पुरवठ्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असून त्यामुळे तालुक्यातील इतर उपकेंद्रांना यीग्य दाबाने विद्युत पुरवठा होणार आहे.



# वन्यजीवाचे रक्षण करणे संतूलीत मानवी जीवनासाठी आवश्यक -- वन परिमंडळ अधिकारी दिनेश मोरे

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

वन्यजीवाचे रक्षण करणे हे संतुलीत मानवी जीवनासाठी आवश्यक असून या वन्यजीवा विषयीची माहीती सर्वांना करून देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन धारूर येथे वन्यजीव सप्ताहाचे कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वनपरिमंडळ अधिकारी दिनेश मोरे यान्ी केले.

राज्यात वन विभागाचे वतीने १ आक्टोबर ते ७ आक्टोबर वन्यजीव सप्ताह साजरा केला. या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. धारूर वन कार्यालयाचे वतीने या निमित्त आयोजीत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तम चिकटे तर प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, पत्रकार सय्यद शाकेर, वडवणीचे वन परिमंडळ अधिकारी दिनेश मोरे, धारूरचे वन परिमंडळ अधिकारी पवार पवन, ईको बटालीयनचे नायब सुभेदार बी एच दिवेकर, सर्पमित्र चंद्रकांत घोगरे, यांचे उपस्थीत संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना सर्पमित्र चंद्रकांत खोगरे यांनी सर्पाचे प्रकार सांगून बिन विषारी सापाची संख्या जास्त आहे मात्र भिती नेच मृत्यु होतात असे सांगून सापाचे प्रकाराची माहीती दिली. यावेळी बोलताना वनपरिमंडळ अधिकारी दिनेश मोरे यांनी वन्य जीवांची माहिति सांगून पर्यावरण संतूलना साठी प्रत्येक वन्यजीव महत्वाचा असून त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीची आहे असे सांगत दुर्मील होणाऱ्या वन्य जीवाची माहिति सांगितली.



# किरण पाटील उर्फ भैय्यासाहेब यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव तथा तिरुपती शिक्षण संस्थेचेचे अध्यक्ष .माननीय किरण पाटील उर्फ भैय्यासाहेब यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला होता श्री खोलेश्वर मंदिर श्री बालाजी मंदिर येथे दीर्घ आयुष्य लाभावे म्हणून महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.त्याचबरोबर शहरातील कर्तुत्वान महिला, यांचा वाढदिवसानिमित्त सन्मान करण्यात आला होता त्यामध्ये अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, सुप्रसिद्ध वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योत्स्ना चाटे मॅडम, सरकारी वकील शोभा काकी सुनील लोमटे, त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रात कर्तुत्वान महिलांचाही सन्मान करण्यात आला यावेळी श्री व्यंकटेश विद्यामंदिर व, कनिष्ठ महाविद्यालय तसेच नारायणा इंग्लिश स्कूल नर्सिंग कॉलेज ज्युनिअर कॉलेज येथे विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.त्यामध्ये निबंध स्पर्धा सुंदर हस्ताक्षर स्पर्धा चित्रकला स्पर्धा.घेण्यात आल्या होत्या.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य .धनंजय शिंदे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून एस एस सूर्यवंशी एस जी चौधरी एम एस ठोंबरे.इत्यादी उपस्थित होते यावेळी प्रमुख मान्यवरांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे संचलन अक्षय सिरसट यांनी, तर आभार प्रशांत पाटोळे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यंकटेश परिवार यांनी पुढाकार घेतला

# डॉ.भारतभूषण क्षीरसागरांनी मला मदत केली, मी योगेशाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार

बीड (प्रतिनिधी)

बीड नगरपरिषद निवडणुकीत आपण डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांना नगरसेवक देऊन राजकीय मदत केली होती. त्यानंतर त्यांनी मला विधानसभा निवडणुकीत निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करू असा शब्द दिला. तो शब्द पाळत भारतभूषण यांनी टोकाचा जातीवाद असताना देखील चौसाळा मतदारसंघातून मला निवडून आणण्यासाठी जीवाचं रान केले होते. त्यामुळे आपण डॉ.योगेशच्या पाठीशी उभा राहणार आहे, असे प्रतिपादन माजी आमदार जनार्धन तुपे यांनी केले.

बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.४) पार पडले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जनार्धन तुपे हे बोलत होते. या शिबिरात १ हजार ९७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यात ५९८ जणांना चष्मे वाटप केले. ३९ जणांची ईसीजी, ४९ जणांची रक्त तपासणी करण्यात आली. तसेच, १३ जणांनी रक्तदान केले.उद्घाटक म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या उपस्थिती होत्या. तसेच, प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प. तुकाराम महाराज भारती, माजी आमदार जनार्धन तुपे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, पिंपळवाडीच्या उपसरपंच पूजाताई बहिरवाळ, बेलखंडीचे सरपंच गुंडीबा देवडे, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, करचुंडीचे माजी सरपंच भालचंद्र भंडाणे,



## माजी आमदार जनार्दन तुपे यांचे प्रतिपादन; पिंपळवाडीत आरोग्य शिबिरात १०९७ रुग्ण तपासणी

भाळवणीचे माजी सरपंच सचिन बहिरवाळ, शिवाजी येडे, मुळूकचे सरपंच रामकिसन कदम, वरवटीचे सरपंच बाळासाहेब इंगोले, लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, मोरगावचे सरपंच लिंबाजी जाधव यांच्यासह पदाधिकार्यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना जनार्धन तुपे म्हणाले की, एकदा शब्द दिला की तो कसा पाळायचा हे डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. आता त्यांचा मुलगा डॉ.योगेश, सुनबाई सारिका हे दोघे बदलत्या परिस्थितीनुसार राजकारण करत आहेत. मला डॉ.भारतभूषण यांनी केलेल्या मदतीची जाणीव ठेवून आपण योगेशला निवडून आणण्यासाठी खंबीरपणे पाठीशी उभा राहणार आहे. त्यांचा पूर्ण ताकदीने प्रचार करू. आरोग्य शिबिरासारख्या सामाजिक कार्यक्रमातून ते रोज लोकांमध्ये जात आहेत. त्यांच्याकडून जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक होतेय, त्यामुळे त्यांना जनतेने येत्या काळात आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन श्री.तुपे यांनी केले. यावेळी श्रीरंग खटाणे, सीताराम बहिरवाळ, रवि काळे, बाळासाहेब थोरात, वैभव तुपे, तुकाराम वाघुले, भास्कर कदम, सुंदर कांगरे, राम जाधव, विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, बाबुराव वाघुले, अंकुश वाघुले, रामहरी वाळेकर, महेश वनवे, बापू येळवे, बाबा मस्के, बाळासाहेब जटाळ, महेश मातकर, शहादेव खोसे, अशोक वेदपाठक यांच्यासह रूग्ण, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली रुग्णांची तपासणी

पिंपळवाडीतील आरोग्य शिबिरास भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रुग्णांसह नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वतः काही रूग्णांची तपासणी केली. विधानसभा मतदारसंघातील पिंपळवाडीचे हे आठवे आरोग्य शिबिर असून अनेकांच्या शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात आल्या आहेत.

आम्ही रोज जनतेच्या दरबारात - डॉ.सारिकाताई क्षीरसागरऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सक्रिय न होता, आम्ही दररोज चोवीस तास बीडकरांच्या सेवेत आहोत. निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करणारे कार्यक्रम घेण्याऐवजी आरोग्य सेवा देणे माझ्यासह डॉ.योगेश यांना योग्य वाटले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतरांप्रमाणे सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात जातो, त्यामुळे बीडची जनता आम्हालाच आशिर्वाद देईल, असा विश्वास कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT